# पुणे प्राईम न्यूज

जनमानसाचा निडर आवाज...

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २०० | शुक्रवार, १३ फेब्रुवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210







## संक्षिप्त

### दूरदर्शनच्या ज्येष्ठ वृत्त निवेदिका सरला माहेश्वरी यांचे निधन

नवी दिल्ली, ता. १२ : ज्या काळात बातम्या म्हणजे केवळ माहिती नाही तर 'विश्वासार्हता' असायची, त्या काळातील एक दिग्गज नाव म्हणजे सरला माहेश्वरी. दूरदर्शनच्या माध्यमातून घराघरांत पोहोचलेल्या प्रसिद्ध वृत्त निवेदिका सरला माहेश्वरी यांचे निधन झाले असून, भारतीय टेलिव्हिजन पत्रकारितेतील एका सुसंस्कृत पर्वाचा आज अंत झाला आहे. त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी १२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ वाजता दिल्लीतील निगमबोध घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत. साधी साडी, कपाळावर छोटी टिकली आणि अत्यंत स्पष्ट शब्दोच्चार ही त्यांची ओळख. 'आजच्या ठळक बातम्या' सांगताना त्यांच्या आवाजात जो संथपणा आणि गांभीर्य असायचे, त्याने प्रेक्षकांना खिळवून ठेवले होते. त्या केवळ बातम्या वाचत नसत, तर त्या बातमीतील सत्यतेचा त्या स्वतः एक पुरावा वाटायच्या. सरला माहेश्वरी यांनी त्या पिढीचे प्रतिनिधित्व केले, ज्यांनी भारतीय पत्रकारितेचा पाया रचला.

# ऑटो कॉर्नर पेट्रोल पंपाच्या कोट्यावधी रुपयांवर मॅनेजरनेच मारला डल्ला

## लोणी काळभोर पोलिसांकडून आरोपीला अटक | आरोपीची रवानगी न्यायालयीन कोठडीत

**लोणी काळभोर, ता. १२ :** कुंजीरवाडी (ता. हवेली) येथील ऑटो कॉर्नर पेट्रोल पंपावर तब्बल १६ वर्षे मॅनेजर म्हणून कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याने विश्वासाचा गैरफायदा घेत तब्बल २ कोटी ६३ लाख रुपयांचा अपहार केल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. बनावट टेस्टींग नोंदी, ग्राहकांच्या रक्कमा थेट वैयक्तिक बँक खात्यात वळवणे तसेच कॅशियरकडून फसवणुकीने रोख रक्कम उचलणे अशा चार प्रकारे आर्थिक गैरव्यवहार केल्याचे ऑडिटमध्ये स्पष्ट झाले आहे.

याप्रकरणी पंपाचे भागीदार अक्षय बाळकृष्ण काळे (वय ३६, मगरपट्टा सिटी, हडपसर) यांनी लोणी काळभोर पोलिस ठाण्यात तक्रार दिली असून, त्यानुसार नितीन रामचंद्र रायपुरे (वय ५२, रा. घोरपडेवस्ती, शांती किरण सोसायटी, कदमवाकवस्ती, ता. हवेली) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी आरोपीला अटक केली. न्यायालयात हजर केल्यानंतर आरोपीला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अक्षय काळे हे आई विजया काळे यांच्यासह ऑटो कॉर्नर पेट्रोल पंपाचे भागीदार असून संपूर्ण व्यवसायाची जबाबदारी अक्षय काळे पाहत होते. आरोपी रायपुरे हा सन २००८ पासून मॅनेजर म्हणून कार्यरत होता आणि पंपावरील सर्व अकाउंट्स त्याच्याकडेच होते. सन २०१८ मध्ये अक्षय काळे यांच्या वडिलांचे निधन झाल्यानंतरही व्यवहारांची जबाबदारी रायपुरे याच्याकडे कायम ठेवण्यात आली होती.



दरम्यान, मार्च २०२४ मध्ये कन्स्ट्रक्शन व्यवसायासाठी घेतलेल्या बँक कर्जानंतर पंपाचा नफा वाढवण्याच्या दृष्टीने अक्षय काळे यांनी व्यवहारांचा तपशील मागितला. मात्र रायपुरे याने हिशोब देण्यास टाळाटाळ करत उडवाउडवीची उत्तरे देण्यास सुरुवात केली. त्यामुळे संशय बळावल्याने अक्षय काळे यांनी मामा प्रविण खेडेकर यांच्या मदतीने सन २०१८ पासूनचे डेली सेल्स रेकॉर्ड, कॅशियर शीट व बँक स्टेटमेंट तपासले.

या तपासात बनावट टेस्टींग नोंदी आढळून आल्या. तसेच पेट्रोल पंपाच्या खात्यात जमा होणे अपेक्षित असलेल्या ग्राहकांच्या रक्कमा आरोपी रायपुरे याच्या वैयक्तिक बँक खात्यात ऑनलाईन ट्रान्सफर झाल्याचे स्पष्ट झाले. जाब विचारताच रायपुरे याने चक्कर आल्याचे नाटक करत हॉस्पिटलमध्ये दाखल होऊन त्यानंतर पंपावर येणेच बंद केले.

यानंतर चार्टर्ड अकाउंटंटमार्फत ऑडिट करण्यात आले. ऑडिट अहवालात बोगस टेस्टींग, ग्राहक रक्कम वैयक्तिक खात्यात वळवणे, कॅशियरकडून खोट्या सबबीखाली रोख उचलणे आणि संशयास्पद बँक व्यवहार अशा चार प्रकारे तब्बल २ कोटी ६३ लाख १५ हजार ९४२ रुपयांचा अपहार झाल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी अक्षय काळे यांच्या फिर्यादीवरून लोणी काळभोर पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ४०८ व ४२० अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर लोणी काळभोर पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. अटक केल्यानंतर आरोपीला न्यायालयात हजर केली असता, न्यायालयाने आरोपीला न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. पुढील तपास लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक रत्नदीप बिराजदार करत आहेत.




## वडापुरीत शेळीपालकावर जीवघेणा हल्ला; चार जनावरे लंपास

**आदित्य बोराटे**

इंदापूर, ता. १२ : वडापुरी परिसरात शेळीचोरीला विरोध केल्याने एका शेळीपालकावर झालेल्या निर्घृण हल्ल्याने तालुक्यात खळबळ उडाली आहे. रविवारी (दि. ८) मध्यरात्री दीडच्या सुमारास घडलेल्या या घटनेमुळे गावात भीतीचे वातावरण पसरले आहे.

वसंत पवार यांनी धाडसाने चोरीला विरोध केल्याची किंमत त्यांना जीवावर बेतणाऱ्या हल्ल्याने मोजावी लागली. त्यांच्या जबाबानुसार, रात्री कुत्र्यांचे भुंकणे ऐकून ते बाहेर पाहण्यासाठी गेले असता शेळ्यांच्या जवळ दोन अनोळखी व्यक्ती संशयास्पद हालचाली करताना दिसल्या. त्यांनी आवाज देताच चोरट्यांनी थेट हल्ला चढवला. एका आरोपीने दगड फेकून त्यांच्या डोक्यात मारला, तर दुसऱ्याने जवळ पडलेला लाकडी खुंट पाठीवर जोरात आपटला. या हल्ल्यात पवार गंभीर जखमी झाले.

अंधाराचा फायदा घेत चोरट्यांनी तीन शेळ्या आणि एक बोकड असा सुमारे हजार रुपयांचा मुद्देमाल पळवून नेला. जखमी अवस्थेत पवार यांनी शेजारी विठ्ठल जाधव यांना संपर्क साधला. त्यानंतर सुरवड येथील स्वप्नील घोगरे यांनी आपल्या वाहनातून त्यांना इंदापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.

या प्रकरणी इंदापूर पोलिस ठाण्यात तीन अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहे. आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून हालचाली वेगात सुरू आहेत.

दरम्यान, तालुक्यात वाढत्या शेळीचोरीच्या घटनांमुळे आणि मालकांवर होणाऱ्या थेट हल्ल्यांमुळे शेळीपालकांमध्ये तीव्र अस्वस्थता पसरली आहे. ग्रामीण भागातील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## शिक्षकांने विद्यार्थ्यांच्या हातावर नेल कट लिहिल्यामुळे पालकांमध्ये संतापाची लाट

**पुणे, ता. १२ :** धनकवडी परिसरातील एका नामांकित शाळेत घडलेल्या प्रकारामुळे पालकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. लहान विद्यार्थ्यांच्या हातावर पेनाने नेल कट असे लिहून त्यांना मैदानावर पळण्याची शिक्षा दिल्याचा प्रकार समोर आला आहे. ही घटना अनंत निर्मल ग्लोबल स्कूल येथे घडल्याचे सांगितले जात आहे. या प्रकारामुळे विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

माहितीनुसार, बुधवारी सकाळी शाळा सुरू झाल्यानंतर क्रीडा शिक्षकांनी विद्यार्थ्यांची तपासणी केली. ज्या मुलांची नखे वाढलेली होती किंवा केस कापलेले नव्हते, अशा विद्यार्थ्यांच्या हातावर पेनाने मोठ्या अक्षरात नेल कट असे लिहिण्यात आले. त्यानंतर या विद्यार्थ्यांना मैदानाचे ४ फेरे मारण्यास सांगितले.

भर उन्हात ही शिक्षा देण्यात आल्याने मुले घाबरली आणि अस्वस्थ झाली.

हातावर लिहिलेल्या शब्दांमुळे अनेक विद्यार्थ्यांनी दिवसभर हात लपवून ठेवले. शाळा सुटल्यानंतर काहीमुलेरडतचघरीगेली.पालकांनी त्यांच्या हातावरील लिहिलेले शब्द पाहिल्यानंतर हा प्रकार उघड झाला. काही मुलांनी शाळेत न पाठवण्याची विनंती केल्याचेही पालकांनी सांगितले.

या शाळेत पहिली आणि दुसरीसाठी ३० ते ४० हजार रुपये शुल्क आकारले जाते. पालकांनी सांगितले की शाळेत डायरी आणि व्हॉट्सॲपचा ग्रुप असताना अशा प्रकारे शिक्षा देणे योग्य नाही. यामुळे मुलांच्या मनावर परिणाम होऊ शकतो. पालकांनी मुख्याध्यापिकांकडे तक्रार केली आहे. मात्र या प्रकरणात केवळ तोंडी सूचना देण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे.

## तरुणाच्या मृत्यूचे कारण शवविच्छेदनाच्या अहवालानंतर समजेल

**पुणे, ता. १२ :** भीमा कोरेगाव परिसरात एका ३० वर्षीय तरुणाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. सुकेन महातो (मूळ रा. पश्चिम बंगाल) असे मृत तरुणाचे नाव असून तो पुणे जिल्ह्यातील शिक्रापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत भावांसोबत वास्तव्यास होता. तो खासगी कंपनीत कार्यरत होता. या प्रकरणावर बोलताना, शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल. असे पोलीस अधीक्षक संदीप सिंग गिल यांनी सांगितले.

दोन दिवसांपूर्वी कोरेगाव परिसरातील एका हॉटेलच्या मागील बाजूस त्याचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी



पाठवला. प्राथमिक तपासात संबंधित तरुण दुपारपासून मद्यपान करत असल्याचे समोर आले असून त्यावेळी काही व्यक्तींशी त्याचा वाद झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या प्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन संशयितांचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंग गिल यांनी सांगितले की, शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल. दरम्यान, या घटनेची सखोल चौकशी सुरू आहे. या घटनेची दखल पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनीही घेतली असून त्यांनी सोशल मीडियावरून दुःख व्यक्त केले आहे. घटनेमागील नेमके कारण आणि आरोपींचा शोध घेण्याचे काम पोलिसांकडून वेगाने सुरू आहे.

## जावेचा खून करणाऱ्या आरोपी महिलेला जन्मठेपेची शिक्षा

सोलापूर, ता. १२ : सोलापूर जिल्ह्यातील एका धक्कादायक प्रकरणात दागिन्यांच्या वादातून मोठ्या जावेने धाकट्या जावेची हत्या करून मृतदेह जाळल्याची घटना उघडकीस आली होती. या प्रकरणात न्यायालयाने आरोपी महिलेला दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

गीता पाडुळे असे शिक्षा झालेल्या महिलेचे नाव असून, उज्वला पाडुळे असे हत्या झालेल्या महिलेचे नाव आहे. उज्वलाचे लग्न २९ नोव्हेंबर २०२२ रोजी किरण पाडुळे यांच्याशी झाले होते. लग्नानंतर काही दिवसांनी ती माहेरी गेली असता तिने आपले मंगळसूत्र व सोन्याची अंगठी घरातील कपाटात ठेवून दिली होती. मात्र, माहेरून परतल्यानंतर दागिने गायब असल्याचे तिच्या निदर्शनास आले.



यावरून उज्वला आणि तिची जाऊ गीता यांच्यात तीव्र वाद झाला. चोरीचा आरोप झाल्याची भावना मनात धरून गीताने संतापाच्या भरात २ फेब्रुवारी २०२३ रोजी घरातच उज्वलाचा गळा आवळून खून केला. गुन्हा लपवण्यासाठी तिने मृतदेहाला आग लावून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. संशय दूर करण्यासाठी अज्ञात व्यक्तीने हल्ला केल्याचा बनाव रचत गीताने स्वतःलाही चाकूने जखमा केल्या.

मात्र, माढा पोलिसांनी सखोल तपास करत घटनाक्रमातील विसंगती उघड केल्या. तपासादरम्यान आरोपीने आखलेला बनाव उघडकीस आला. पोलिसांनी ठोस पुरावे गोळा करून बार्शी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. खटल्यादरम्यान १२ साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली आहे.

सरकारी पक्षाने सादर केलेले पुरावे आणि साक्षीदारांच्या जबाबांवर विश्वास ठेवत न्यायालयाने गीता पाडुळे हिला जन्मठेप आणि दंडाची शिक्षा सुनावली आहे.

## खेळताना खड्ड्याच्या पाण्यात पडून ८ वर्षाच्या मुलाचा मृत्यू

**कोल्हापूर, ता. १२ :** कोल्हापूर शहरातील जवाहरनगर परिसरात महापालिकेच्या दीर्घकाळच्या दुर्लक्षामुळे एका पाच वर्षीय बालकाचा जीव गेल्याची अत्यंत दुर्दैवी घटना घडली आहे. सरनाईक वसाहतीत आठ वर्षांपूर्वी अपार्टमेंटच्या बांधकामासाठी सुमारे २० फुट खोल, ४० फुट लांब आणि २६० चौरस फुट रुंद असा खड्डा खोदण्यात आला होता. मात्र, डीपी रोडच्या वादामुळे काम अर्धवट राहिले आणि हा खड्डा तसेच उघडा पडून राहिला. काळानुसार त्यात पाणी साचले, शेवाळ वाढले आणि तो परिसरासाठी धोकादायक सापळा ठरला.

बुधवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास इजान अक्रम बारगीर हा पाच वर्षांचा मुलगा घराबाहेर खेळायला गेला. बराच वेळ उलटूनही तो परत न आल्याने कुटुंबीयांनी शोध सुरू



केला. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर तो मशीदीच्या दिशेने गेल्याचे दिसले. अखेर जवळच असलेल्या पाण्याने भरलेल्या खड्ड्यात त्याचा मृतदेह सापडला. पाण्यावर शेवाळ असल्याने खड्ड्याची खोली किंवा धोकादायक स्वरूप सहज लक्षात येत नव्हते.

या खड्ड्याबाबत स्थानिकांनी वारंवार तक्रारी केल्या होत्या. उपोषण, निवेदने यानंतरही तो बुजवण्यात आला नाही. विशेष म्हणजे या ठिकाणाजवळच उर्दू शाळा असून सुमारे ६०० विद्यार्थी दररोज ये-जा करतात. त्यामुळे हा प्रश्न केवळ एका कुटुंबापुरता मर्यादित नसून संपूर्ण परिसराच्या सुरक्षेशी संबंधित आहे.


महापालिका आणि कंत्राटदार यांच्यातील जबाबदारीच्या वादात नागरिकांचे जीव धोक्यात आले, अशी भावना परिसरात व्यक्त होत आहे. सार्वजनिक ठिकाणी उघडे, संरक्षक कुंपण नसलेले खड्डे ठेवणे ही गंभीर बेपर्वाई मानली जाते. या घटनेनंतर तरी प्रशासनाने तत्काळ कारवाई करून खड्डा बुजवणे, तसेच शहरातील अशा धोकादायक ठिकाणांची पाहणी करून उपाययोजना करणे अत्यावश्यक ठरते. अन्यथा अशा दुर्घटना पुन्हा घडण्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

## हवेली दुय्यम निबंधक कार्यालय क्रमांक २० बंद असून अजूनही तीन दिवस बंद राहणार?

### नागरिकांचे व्यवहार ठप्प, प्रशासनाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर

**लोणी काळभोर, ता. १२ :** आंबेगाव (पुणे) येथील हवेली दुय्यम निबंधक कार्यालय क्रमांक २० हे गेल्या दोन दिवसांपासून बंद असल्याने नागरिकांचे अत्यावश्यक दस्त नोंदणी व्यवहार पूर्णपणे ठप्प झाले आहेत. प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनाचा फटका थेट सामान्य नागरिकांना बसत असून, घर, प्लॉट व शेतजमिनींच्या खरेदी-विक्री व्यवहारांवर मोठा परिणाम झाला आहे. आर्थिक नुकसानासह नागरिकांची प्रचंड गैरसोय होत आहे.

या कार्यालयातील सहाय्यक दुय्यम निबंधक काही दिवसांपूर्वी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या कार्यकाळात उलटसुलट कारभार झाल्याची जोरदार चर्चा




असून, त्या पार्श्वभूमीवर पुढील अधिकारी अडचणीत येतील, अशी भीती कर्मचाऱ्यांत पसरली आहे. येथे पदभार स्वीकारल्यास नोकरी धोक्यात येईल आणि आपणच अडचणीत सापडू, या मानसिकतेमुळे गेल्या दोन दिवसांपासून एकाही अधिकाऱ्याने चार्ज स्वीकारलेला नाही, ही धक्कादायक बाब समोर आली आहे.

या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात पुणे शहरासह आजूबाजूच्या अनेक गावांचा समावेश होतो. दररोज शेकडो नागरिक नोंदणीसाठी येत असतात. मात्र कार्यालय बंद असल्याने नागरिकांची तारांबळ उडाली आहे. अनेकांनी कर्ज प्रक्रिया पूर्ण केली असूनही दस्त नोंदणी रखडली आहे. लग्न, गृहप्रवेश, व्यावसायिक करार अशा महत्त्वाच्या तारखा अडकल्याने संतापाचा उद्रेक होत आहे.

विशेष म्हणजे, वरिष्ठ स्तरावरून अद्याप कायमस्वरूपी पर्यायी नियुक्ती करण्यात आलेली नाही. डिजिटल इंडिया व सुलभ सेवाचा गजर करणाऱ्या शासनाच्या कारभारावर यामुळे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एका अधिकाऱ्याच्या सेवानिवृत्तीनंतर संपूर्ण कार्यालय बंद पडणे हे प्रशासनाचे गंभीर अपयश असल्याची तीव्र प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करत आहेत.

दरम्यान, तातडीने नवीन सहाय्यक दुय्यम निबंधकाची नियुक्ती करून कार्यालय सुरू करावे, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिक व व्यावसायिकांनी दिला आहे. महसूल व नोंदणी विभागाने त्वरित हस्तक्षेप करून नागरिकांची गैरसोय दूर करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.


> हवेली दुय्यम निबंधक कार्यालय क्रमांक २० साठी तात्पुरत्या स्वरूपात एका सहाय्यक दुय्यम निबंधकाची नेमणूक करण्यात आली होती. मात्र त्यांची तब्येत बिघडल्याने ते आजारी आहेत. सध्या तेथे कोणीही काम करत नाही. आमच्याकडे सध्या सहाय्यक दुय्यम निबंधक उपलब्ध नाही. सोमवारपासून नेमणूक करून काम सुरू करू.
> - **संतोष हिंगाणे,** (सहाय्यक जिल्हा निबंधक, पुणे)

## संक्षिप्त

### जमिनीच्या 'एनए' परवानगीची अट रद्द?



**मुंबई, ता. १२ :** राज्यात घर बांधण्यासाठी किंवा जमीन अकृषक करण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांना जिल्हाधिकारी कार्यालयाच्या चकरा माराव्या लागत होत्या. मात्र, आता राज्य सरकारने या प्रक्रियेत आमूलाग्र बदल करून नागरिकांना मोठा दिलासा दिला आहे. नवीन नियमानुसार, अकृषक जमिनीसाठी जिल्हाधिकाऱ्यांची स्वतंत्र परवानगी घेण्याची अट रद्द करण्यात आली असून, स्थानिक प्राधिकरणाने मंजूर केलेला 'बांधकाम नकाशा' हीच आता अधिकृत एनए परवानगी मानली जाणार आहे. आतापर्यंतची प्रक्रिया अत्यंत क्लिष्ट होती. नगररचना विभागाकडून बांधकाम नकाशा मंजूर झाल्यानंतरही नागरिकांना एनए सनदेसाठी महसूल विभागाकडे पुन्हा अर्ज करावा लागत असे. यामध्ये वेळ आणि पैसा दोघांचाही अपव्यय व्हायचा. मुख्यमंत्री आणि महसूल मंत्र्यांच्या पुढाकाराने महाराष्ट्र जमीन महसूल संहितेत ही महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आली आहे. बांधकाम परवानगी मिळताच महसूल विभागाच्या संगणकीय प्रणालीद्वारे ७/१२ उताऱ्यावर 'बिनशेती' झाल्याची नोंद आपोआप घेतली जाईल.दरवर्षी भरावा लागणारा अकृषक कर आता कायमचा बंद झाला आहे. त्याऐवजी जमिनीच्या बाजारमूल्यानुसार केवळ एकदाच 'रुपांतरण अधिमूल्य' भरावे लागेल. अनेक बँका एनए सनदेशिवाय कर्ज देत नसत. आता बांधकाम परवानगीच्या आधारावर बँकांना कर्ज द्यावे लागेल, तसे स्पष्ट आदेशच बँकांना देण्यात आले आहेत.



### मुलाने दारूच्या नशेत वडिलांना जिवंत पेटवलं, उपचारादरम्यान बापाचा मृत्यू

**पुणे, ता. १२ :** माणुसकीला काळिमा फासणारी एक अत्यंत हृदयद्रावक घटना पुण्याच्या दांडेकर पूल परिसरात घडली आहे. दारूच्या नशेत धुंद असलेल्या एका २८ वर्षीय मुलाने किरकोळ वादातून चक्क आपल्या जन्मदात्या वडिलांच्या अंगावर पेट्रोल ओतून त्यांना जिवंत पेटवून दिले. पाच दिवस मृत्यूशी झुंज दिल्यानंतर अखेर वडिलांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून, या घटनेने संपूर्ण पुणे हादरले आहे.मयत रवींद्र उद्धव भालेराव (६१) हे सुतारकाम करून उदरनिर्वाह करत होते. मात्र, रवींद्र आणि त्यांचा मुलगा सागर (२८) या दोघांनाही मद्याचे तीव्र व्यसन होते. ७ फेब्रुवारीच्या रात्री सवयीप्रमाणे दोघेही नशेत असताना त्यांच्यात घरगुती कारणावरून वाद झाला. हा वाद इतका विकोपाला गेला की, सागरने पेट्रोल वडिलांवर ओतून काडी पेटवली. वडिलांना आगीच्या ज्वाळांत होरपळताना पाहून सागरला शुद्ध आली आणि त्याने स्वतः आग विझवण्याचा प्रयत्न केला. त्यानेच वडिलांना तातडीने ससून रुग्णालयात दाखल केले. मात्र, तोपर्यंत उशीर झाला होता. ५० टक्क्यांहून अधिक भाजल्यामुळे रवींद्र यांची प्रकृती चिंताजनक होती. पाच दिवस डॉक्टरांनी शर्थीचे प्रयत्न केले, पण मंगळवारी मध्यरात्री त्यांची प्राणज्योत मालवली.पर्वती पोलिसांनी आता सागरवर खुनाचा (कलम १०३-१) गुन्हा दाखल केला आहे.

### अवघ्या १ हजार रुपयांसाठी पत्नीचा सौदा

**उत्तर प्रदेश, ता. १२ :** माणुसकीला काळिमा फासणारी आणि नात्यातील विश्वासाला तडा देणारी एक संतापजनक घटना उत्तर प्रदेशातील बदायूं जिल्ह्यातून समोर आली आहे. आपल्या व्यसनासाठी किंवा पैशांच्या हव्यासापोटी एका पतीने आपल्याच पत्नीला अवघ्या १,००० रुपयांसाठी मित्रांच्या हवाली केले. यानंतर त्या नराधम मित्रांनी महिलेवर सामूहिक बलात्कार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना फैजगंज बेहटा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. पीडित महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, तिचा पती 'छट्टन' याने केवळ १,००० रुपयांच्या बदल्यात तिला आपल्या दोन मित्रांसोबत पाठवून दिले. आरोपी बालकिशन आणि पप्पू यांनी या महिलेला एका निर्जन स्थळी नीलगिरीच्या बागेत नेले आणि तिथे तिच्यावर आळीपाळीने अत्याचार केला. पिडीत महिलेने या घटनेनंतर खचून न जाता हिंमत दाखवत पोलीस ठाणे गाठले आणि आपबिती सांगितली. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तातडीने गुन्हा दाखल केला.पोलिसांनी तातडीने शोधमोहीम राबवून बालकिशन आणि पप्पू या दोन्ही मुख्य आरोपींना अटक केली आहे. पत्नीचा सौदा करणारा नराधम पती छट्टन सध्या फरार असून, त्याला पकडण्यासाठी पोलिसांची दोन पथकेरवाना करण्यात आली आहेत.

### प्रेमसंबंधातून १९ वर्षांच्या तरुणीची हत्या

मुंबई, ता. १२ : गोवंडी परिसरात १९ वर्षांच्या तरुणीच्या हत्येची घटना समोर आल्यानंतर परिसरात खळबळ उडाली आहे. शिफा शेख असे मृत तरुणीचे नाव असून तिच्यावर गोळीबार करण्यात आला होता. या प्रकरणी पोलिसांनी चौघांना अटक केली आहे. साजिद शेख, कलाम चौधरी, रिझवान शेख उर्फ नदीम आणि तबस्सूम शेख अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. स्थानिक न्यायालयाने सर्व आरोपींना १८ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. ही घटना १० फेब्रुवारी रोजी सकाळी सुमारे १०.३० वाजता घडली. शिफा शेख घराबाहेर न्याहारीसाठी गेली असताना तिच्यावर गोळीबार केला. जखमी अवस्थेत तिला तातडीने शासकीय रुग्णालयात नेण्यात आले.

# जमिनीवरील बेकायदेशीर बांधकाम प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांचे हवेली तहसीलदारांना अहवाल सादर करण्याचे निर्देश

लोणी काळभोर, ता. १२: मौजे उरुळी देवाची (ता. हवेली, जि. पुणे) येथील सर्वे नं. १११, २११ व २२२/६ या इनाम वर्ग ६-ब महार वतन जमिनीवरील बेकायदेशीर बांधकाम व भूमाफियांच्या कारवायांबाबत प्रशासनाने अखेर कडक भूमिका घेतली आहे. या प्रकरणी हवेलीचे तहसीलदारांना १२ फेब्रुवारी २०२६ पूर्वी सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आले आहेत. अहवाल न दिल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अंतर्गत कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.



या संदर्भात उरुळी देवाची येथील नागरिक अमोल अशोक बहुले यांनी तक्रार अर्ज दाखल केला असून, इनाम जमिनीवर बेकायदेशीर खरेदी-विक्री व्यवहार तसेच अनधिकृत बांधकाम झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडून यापूर्वी २२ऑगस्ट २०२५', १७ नोव्हेंबर २०२५ व ३० डिसेंबर २०२५ रोजी पत्रव्यवहार करून तहसीलदारांकडून सविस्तर माहिती मागविण्यात आली होती. मात्र, अडीच महिन्यांचा कालावधी उलटूनही अद्याप अहवाल प्राप्त न झाल्याने प्रशासन नाराज झाले आहे. या प्रकरणी पुणे जिल्हाधिकारी पुणे यांनी समक्ष सूचना देत १२ फेब्रुवारीपूर्वी अहवाल सादर करण्याचे अंतिम निर्देश दिले असून, उपजिल्हाधिकारी (र.रा.) नामदेव टिळेकर यांनी डिजिटल स्वाक्षरीत आदेश निर्गमित केले आहेत.

दरम्यान, उरुळी देवाची परिसरात भूमाफियांकडून इनाम जमिनींचा गैरवापर करून मोठ्या प्रमाणावर प्लॉटिंग व बांधकाम सुरू असल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत. प्रशासनाच्या या कडक भूमिकेमुळे संबंधित अधिकाऱ्यांवर दबाव वाढला असून, आता कारवाई होते की पुन्हा फाईलफेरी होते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**प्रशासनाने उपस्थित केलेल्या प्रमुख मुद्द्यांमध्ये**

- सदर जमिनीवरील खरेदी-विक्री व्यवहार सक्षम प्राधिकाऱ्यांच्या परवानगीने झाले आहेत काय?
- बांधकामासाठी विनशेती सारा व ५० टक्के नजराणा शासनाकडे भरलेला आहे काय?
- भूखंडनिहाय वस्तुस्थितीचा अहवाल व संबंधित कागदपत्रे सादर करण्यात यावीत, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत.

# पुण्यातील एमआयटी युनिव्हर्सिटीत सांस्कृतिक महोत्सवादरम्यान राडा!

## बांगलादेशच्या स्टॉलची तोडफोड

**पुणे, ता. १२ :** एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी येथे आयोजित जागतिक सांस्कृतिक महोत्सवादरम्यान तोडफोडीची घटना घडल्याची माहिती समोर आली आहे. मंगळवारी संध्याकाळी वार्षिक कार्यक्रम सुरू असताना काही जणांनी कॅम्पसमध्ये प्रवेश करून बांगलादेशचे प्रतिनिधित्व करणाऱ्या फुड स्टॉलची तोडफोड केल्याचा आरोप आहे. तसेच बांगलादेशचा ध्वज जाळल्याचीही चर्चा आहे. या घटनेमुळे कार्यक्रमस्थळी काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

प्राथमिक माहितीनुसार, या सांस्कृतिक महोत्सवात विविध देशांचे खाद्यपदार्थ, संगीत आणि परंपरा सादर केल्या जातात. भारतीय तसेच परदेशी विद्यार्थी मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभागी झाले होते. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, काही व्यक्ती अचानक कॅम्पसमध्ये घुसल्या आणि बांगलादेशशी संबंधित स्टॉलला लक्ष्य केले. यामुळे विद्यार्थी आणि आयोजकांमध्ये घबराट पसरली.




एमआयटी-डब्ल्यूपीयूचे रजिस्ट्रार गणेश बी. पोकळे यांनी सांगितले की, विद्यापीठ प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेतली आहे. अनधिकृत व्यक्तींनी कॅम्पसमध्ये प्रवेश केल्याची प्राथमिक माहिती असून पोलिसांकडे औपचारिक तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. जागतिक सांस्कृतिक महोत्सव हा विविध संस्कृतींचा सन्मान करणारा कार्यक्रम आहे आणि आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना आपली परंपरा सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

विद्यापीठाने सर्व विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित आणि आदरयुक्त वातावरण राखण्याची बांधिलकी व्यक्त केली आहे. पोलिसांकडून सीसीटीव्ही फुटेज आणि साक्षीदारांचे जबाब तपासले जात असून पुढील कारवाई केली जाणार आहे. घटनेबाबत अधिक तपास सुरू आहे.

## मुळशीत भरधाव टेम्पोने ५ गाड्यांना उडवलं; ५ जण जखमी

**पुणे, ता. १२ :** मुळशीत एका नियंत्रण सुटलेल्या भरधाव आयशर टेम्पोने समोर येईल त्या वाहनाला अक्षरशः उडवत पाच वाहनांचा चक्काचूर केला. काल दुपारच्या सुमारास मुळशी येथील रस्त्यावर नेहमीप्रमाणे वर्दळ होती. अचानक एक आयशर टेम्पो सुसाट वेगाने आला. चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने या टेम्पोने एका रिक्षेला, कारला आणि दोन दुचाकींना जोरदार धडक दिली.

टेम्पो इतक्या वेगात होता की, एका दुचाकीस्वाराला सावरण्याची संधीही मिळाली नाही. दुर्दैवाने, टेम्पोचे चाक तरुणाच्या पायावरून गेले. तो तरुण रस्त्यावरच वेदनेने तडफडत होता.

सुदैवाने, या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही, परंतु एका तरुणाचा पाय गंभीर जखमी झाला असून इतर ४ ते ५ जण जखमी झाले आहेत. धडक बसलेल्या सर्व वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे.




पुणे आणि आसपासच्या ग्रामीण भागात अवजड वाहनांची वर्दळ प्रचंड वाढली आहे. इथे वाहनांची गर्दी असते. मात्र, अरुंद रस्ते आणि त्यात चालकांचा बेदरकारपणा यामुळे सामान्य नागरिकांचे प्राण धोक्यात आले आहेत. दरम्यान, अशा घटना भविष्यात घडू नये म्हणून काय उपाय योजना केल्या जातात याकडे सर्वांचे लक्ष लागेल आहे.

## रीलस्टार प्रथमेश कदमला आत्महत्येची गरज नव्हती म्हणत आईने उघड केलं सत्य

**मुंबई, ता. १२ :** सोशल मीडियावर आपल्या डान्स आणि विनोदी व्हिडिओंनी लाखो चाहत्यांची मने जिंकणारा प्रसिद्ध रीलस्टार प्रथमेश कदम याचे २६ जानेवारी रोजी निधन झाले. तरुण वयात प्रथमेशने जगाचा निरोप घेतल्याने सोशल मीडियावर अफवांचे पीक आले होते. प्रथमेशने आत्महत्या केली का? अशा चर्चांना उधाण आले असतानाच, आता त्याच्या आईने समोर येऊन या सर्व चर्चांमागचे सत्य उघड केले आहे.


प्रथमेशची आई प्रज्ञा कदम यांनी सोशल मीडियावर एक भावूक व्हिडिओ शेअर केला आहे. त्या म्हणतात की, प्रथमेशला कोणताही मानसिक त्रास नव्हता किंवा त्याने आत्महत्या केलेली नाही. त्याच्या मृत्यूचे खरे कारण 'पांढरी कावीळ' हे आहे. सुरुवातीला प्रथमेशला रुग्णालयात दाखल केले तेव्हा त्याचे रिपोर्ट्स सामान्य वाटत होते. शेवटच्या क्षणापर्यंत कावीळ असल्याचं कोणाच्याही लक्षात आले नाही. जेव्हा ती त्याच्या संपूर्ण रक्तात पसरली, तेव्हा डॉक्टरांनीही हात टेकले. प्रथमेशची आई प्रज्ञा कदम यांनी व्हिडीओ पोस्ट करत सांगितले कि, माझ्या मुलाबद्दल चुकीच्या अफवा पसरवू नका, अशी विनंती त्यांनी हात जोडून केली आहे. एका आईसाठी आपला तरुण मुलगा गमावणे हे दुःख मोठे आहेच, पण लोकांच्या चुकीच्या चर्चांमुळे होणारा मनस्ताप अधिक वेदनादायक असतो.



## पुण्यात थंडी गायब! आगामी काळात पारा ३४ अंशांवर जाणार

**पुणे, ता. १२ :** शहरात गेल्या काही दिवसांपासून थंडीचा जोर ओसरला असून आता उन्हाच्या झळा जाणवू लागल्या आहेत. आज, १२ फेब्रुवारी रोजी पुण्याचे कमाल तापमान ३१ओउ पर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे, तर किमान तापमान १७ओउ ते १८ओउ च्या आसपास राहील. सकाळी थोडा गारवा असला तरी दुपारच्या वेळी कडक ऊन पडणार असल्याने नागरिकांना उकाड्याचा सामना करावा लागणार आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, आज पुण्यात दिवसभर आकाश प्रामुख्याने स्वच्छ आणि निरभ्र राहील. हवेतील आर्द्रतेचे प्रमाण सकाळी ५०% च्या आसपास होते, जे दुपारपर्यंत २९% पर्यंत खाली येण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी सुमारे ६.१ ते १० किमी असून तो प्रामुख्याने पूर्व दिशेकडून वाहत आहे. पावशाची कोणतीही शक्यता वर्तवण्यात आलेली नाही.



वाढत्या तापमानामुळे दुपारच्या वेळी घराबाहेर पडणाऱ्या नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विशेषतः दुपारी १२ ते या वेळेत सूर्याची तीव्रता अधिक असल्याने डिहायड्रेशन टाळण्यासाठी पुरेसे पाणी पिण्याचा सल्ला देण्यात आला आहे. हवेचा दर्जा सध्या १५४ ते १६३ च्या दरम्यान असल्याने तो 'अस्वस्थ' श्रेणीत मोडतो, त्यामुळे श्वसनाचे विकार असलेल्या व्यक्तींनी सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

येत्या काही दिवसांत पुण्याच्या कमाल तापमानात आणखी वाढ होऊन ते ३३ओउ ते ३४ओउ पर्यंत जाण्याचा अंदाज आहे. आज पुण्यात सूर्योदय सकाळी ७:०४वाजता झाला असून सूर्यास्त संध्याकाळी ६:३३ वाजता होईल. हिवाळा संपून आता अधिकृतपणे उन्हाळ्याची चाहूल लागल्याचे चित्र शहरात दिसत आहे.

## पुणे–नागपूर दरम्यान धावणार 'सुपरफास्ट' स्पेशल ट्रेन

**पुणे, ता. १२ :** प्रवाशांकडून वाढत असलेल्या मागणीची दखल घेत मध्य रेल्वेने पुणेनागपूर मार्गावर विशेष रेल्वेगाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबई ते नागपूर, कोल्हापूर, सावंतवाडी तसेच पुणे ते नागपूर या मार्गांवर एकूण २४ विशेष गाड्या धावणार आहेत. त्यापैकी पुणेनागपूरपुणे सुपरफास्ट विशेष गाडीच्या ४ फेऱ्या फेब्रुवारी महिन्यात होणार आहेत. या निर्णयामुळे विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.



रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, पुणे ते नागपूर विशेष गाडी क्रमांक ०१४६७ ही १३ आणि २० फेब्रुवारी रोजी दुपारी ३.५० वाजता पुणे स्थानकावरून सुटेल. ही गाडी दुसऱ्या दिवशी सकाळी ६.३० वाजता नागपूर येथे पोहोचेल. त्याचप्रमाणे नागपूर ते पुणे विशेष गाडी क्रमांक ०१४६८ ही १४ आणि २१ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता नागपूरहून निघून रात्री ११.३० वाजता पुण्यात पोहोचेल.

याशिवाय पुणेनागपूरपुणे सुपरफास्ट गाडीच्या आणखी २ फेऱ्यांची घोषणा करण्यात आली आहे. पुणे ते नागपूर सुपरफास्ट गाडी क्रमांक ०१४१९ ही १८ फेब्रुवारी रोजी दुपारी ३.५० वाजता पुण्याहून सुटून दुसऱ्या दिवशी सकाळी ६.३० वाजता नागपूरला पोहोचेल. तर नागपूर ते पुणे सुपरफास्ट गाडी क्रमांक ०१४२० ही १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता नागपूरहून सुटून त्याच दिवशी रात्री ११.३० वाजता पुण्यात दाखल होईल. सण-उत्सव, परीक्षा, कौटुंबिक कारणे आणि व्यावसायिक कामांसाठी या मार्गावर प्रवाशांची संख्या वाढलेली आहे. आरक्षित तिकिटे लवकर भरत असल्याने विशेष गाड्यांची मागणी करण्यात येत होती. या पार्श्वभूमीवर रेल्वेने हा निर्णय घेतला आहे.

दरम्यान, या सर्व विशेष गाड्यांसाठी तिकिटांचे आरक्षण रेल्वेच्या अधिकृत आरक्षण केंद्रांवर तसेच आयआरसीटीसीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. प्रवाशांनी वेळापत्रक आणि थांबे यांची माहिती तपासून तिकिटे आरक्षित करावीत, असे आवाहन मध्य रेल्वेने केले आहे.

## जिंती येथे बॉबीराजे भोसले जयंती निमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप

**जिंती, ता. १२ :** कुणाचाही तंटा असुद्या, जागच्या जागीच मिटवायचा; नागरिकांना पोलीस ठाण्याची पायरी चढावी लागू नये, असा विचार बॉबीराजांनी समाजात रुजवला. स्वाभिमान काय असतो, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले. वाघासारखे जगण्यासाठी शिकवलेले त्यांचे विचार आजही जिवंत आहेत, असे प्रतिपादन प्रा. नानासाहेब पवार यांनी केले.

जिंती (ता. करमाळा) येथे गुरुवारी (ता. १२) बॉबीराजे भोसले यांची जयंती विविध सामाजिक उपक्रमांसह मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात प्रा. पवार प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. नितीनराजे भोसले होते. यावेळी मधुकर जगताप, अनिल शेजाळ, बाबू आंबघरे, काशिनाथ गिरंजे, संतोष वारगड, सुरेश झांजुर्णे, सुरेश गुंजाळ, महादेव गिरंजे, सरपंच भागडे पाटील, आजीनाथ मुटके, संतोष गुळवे, सागर गोडसे, बापू शेंडगे यांच्यासह परिसरातील मान्यवर, ग्रामस्थ, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुरुवातीस बॉबीराजे भोसले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



पुढे बोलताना प्रा. पवार म्हणाले, बॉबीराजे भोसले यांनी समाजात अन्यायाविरुद्ध लढण्याची ताकद निर्माण केली. आत्मसन्मान, शिस्त आणि सामाजिक बांधिलकी यांचा वारसा त्यांनी पुढील पिढीला दिला. त्यांच्या विचारांमुळेच आज अनेक युवक सकारात्मक दिशेने वाटचाल करत आहेत.

दरम्यान, बॉबीराजे भोसले यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक बांधिलकी जपत विविध शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आले. एस. यु. राजेभोसले हायस्कूल, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तसेच न्यू साई समर्थ पब्लिक स्कूलमधील शेकडो विद्यार्थ्यांना वही, पेन, पुस्तके आदी शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता.

शेवटी सर्व उपस्थितांनी बॉबीराजे भोसले यांच्या विचारांचा अंगीकार करण्याचा संकल्प केला. या कार्यक्रमामुळे जिंती परिसरात सामाजिक ऐक्य आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले.

# शिवनेरी सहलीला निघालेल्या विद्यार्थ्यांच्या बसचा ओतूरजवळ अपघात

**पुणे, ता. १२ :** किल्ले शिवनेरी येथे सहलीसाठी निघालेल्या विद्यार्थ्यांच्या बसचा कल्याणअहिल्यानगर महामार्गावर ओतूरजवळ अपघात झाला. बस चालकाचे नियंत्रण सुटल्याने बस रस्त्याच्या दुभाजकाला धडकली. या अपघातात सुमारे १० ते १५ विद्यार्थी जखमी झाले आहेत. त्यांच्यावर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू असून सर्वांची प्रकृती स्थिर असल्याची प्राथमिक माहिती आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, अहिल्यानगर जिल्ह्यातील ५३ विद्यार्थी शिवनेरी किल्ला पाहण्यासाठी निघाले होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान पाहिल्यानंतर हे विद्यार्थी अष्टविनायक दर्शनासाठी जाणार होते. सहलीचा आनंद सुरू असतानाच ओतूर शिवारात ही घटना घडली. महामार्गावर बस वेगात असताना चालकाचा ताबा सुटला आणि बस दुभाजकाला धडकली. घटनास्थळी मदतकार्य सुरु अपघातानंतर बसमधील विद्यार्थ्यांमध्ये घबराट पसरली. स्थानिक नागरिकांनी आणि पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. जखमी विद्यार्थ्यांना जवळील खासगी तसेच सरकारी रुग्णालयात हलवण्यात आले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

या बसमध्ये एकूण ५३ विद्यार्थी आणि काही शिक्षक उपस्थित होते, अशी माहिती समोर आली आहे. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. बसमध्ये तांत्रिक बिघाड होता की चालकाची चूक झाली, याची चौकशी ओतूर पोलीस करत आहेत. या घटनेमुळे विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# आळंदी म्हातोबाची येथे चायनीज खाण्यासाठी थांबलेल्या तरुणांवर टोळक्याकडून जीवघेणा हल्ला

**लोणी काळभोर, ता. १२ :** जुन्या वादातून एका टोळक्याने तीन मित्रांवर लाकडी दांडक्याने व लाथाबुक्यांनी अमानुष मारहाण केल्याची घटना घडली आहे. ही घटना आळंदी म्हातोबाची (ता. हवेली) येथील म्हातोबा विद्यालयासमोर असलेल्या चायनीज सेंटरसमोर घडली आहे. या हल्ल्यात एकाचा डावा पाय फ्रॅक्चर झाला आहे. तर दोघेजण जखमी झाले आहेत. याप्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होताच, पोलिसांनी दोन्ही आरोपींना तत्काळ अटक केली आहे.

शुभम खटाटे (वय २५), बंटी खटाटे (वय २७, दोघेही रा. रामशेवाडी, आळंदी म्हातोबाची, ता. हवेली) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. तर इतर दोन अनोळखी जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या हल्ल्यात शुभम संजय धुमाळ (वय २४, रा. धुमाळ मळा, थेऊर फाटा, कुंजीरवाडी, ता. हवेली) यांच्यासह करण शंकर गावडे (रा. नायकाळी) व प्रवीण राजाभाऊ घोडके (रा. मगरवस्ती, आळंदी म्हातोबाची ता. हवेली) असे जखमी झालेल्या तिघांची नावे आहेत. तर शुभम धुमाळ हा गंभीर जखमी झाला असून त्याचा पाय फ्रॅक्चर झाला आहे.





पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुभम धुमाळ, करण गावडे व प्रवीण घोडकेहे तिघेजण एकमेकांचे मित्र आहेत. करण गावडे याचे शुभम खटाटे व बंटी खटाटे यांच्याशी भांडणे झाली होती. शुभम धुमाळ, करण गावडे व प्रवीण घोडकेहे तिघेजण चायनीज खाण्यासाठी सोमवारी (ता. २) रात्री साडेआठच्या सुमारास थांबले होते. तेव्हा आरोपी शुभम खटाटे, बंटी खटाटे व त्यांच्या दोन साथीदारांनी अचानक हल्ला चढवला.

सुरुवातीला करण गावडे यास मारहाण सुरू करण्यात आली. करणला का मारताय याचा जाब विचारण्यासाठी गेल्यानंतर आरोपींनी शुभम धुमाळ यांनाही बेदम मारहाण केली. हल्लेखोरांनी लाकडी दांडके, हाताबुक्या व लाथांचा मारा करत आज तुम्हाला सोडणार नाही अशी धमकी दिली. या हल्ल्यात शुभम धुमाळ यांच्या डोक्याला जखम झाली असून डावा पाय फ्रॅक्चर झाला आहे. उजव्या पायालाही गंभीर मार लागला आहे. करण गावडे याला मुकामार तर प्रवीण घोडके याच्या डोक्याला दुखापत झाली आहे. दरम्यान, जखमी शुभम धुमाळ यांच्यावर सध्या ससून रुग्णालयात उपचार सुरू असून एमएलसी अहवालानंतर पोलिसांनी घटनास्थळी येऊन तक्रार नोंदवली आहे. त्यानुसार भारतीय न्याय संहिता ११८ (२), ११५ (२), ३५१ (२), ३५१(३), ३५२, २ (५) व महाराष्ट्र पोलीस अधिनियमन ३७ (१), ३७ (२), ३७ (३) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच, लोणी काळभोर पोलिसांनी शुभम खटाटे व बंटी खटाटे यांना अटक केली आहे. अटक केल्यानंतर आरोपींना न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने आरोपींना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. तर उर्वरित दोन आरोपी फरार झाले आहेत. पोलिसांचे एक पथक आरोपींच्या मागावर आहेत. पुढील तपास लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक रत्नदीप बिराजदार करत आहेत.

# कोस्टल रोडवर जय होची धून; मुंबईकरांचा प्रवास होणार सुपरफास्ट

**मुंबई, ता. १२ :** मुंबईकरांसाठी नुकताच खुला झालेला कोस्टल रोड आता एका नव्या वैशिष्ट्यामुळे चर्चेत आला आहे. भारतातील पहिला मेलोडी रोड म्हणून या मार्गाची ओळख निर्माण होत असून, वाहनचालकांना प्रवासादरम्यान स्लमडॉग मिलेनियर चित्रपटातील जय हो या गाण्याची धून ऐकण्याचा अनोखा अनुभव मिळणार आहे.



धर्मवीर स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज सागरी किनारी रस्ता या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला ही अभिनव संकल्पना जोडण्यात आली आहे. ११ फेब्रुवारीपासून मुंबईकरांसाठी खुल्या करण्यात आलेल्या या मार्गाचे उद्घाटन अमरसन्स गार्डनजवळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झाले.

मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून, माजी खासदार राहुल शेवाळे यांच्या संकल्पनेतून हा मेलोडी रोड साकारण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यात ५०० मीटर लांबीच्या विशेष संगीतमय पट्ट्या (रिब्स) बसविण्यात आल्या आहेत. या पट्ट्यांमधील विशिष्ट अंतर आणि त्यावरून ताशी ६० ते ७० किलोमीटर वेगाने जाणाऱ्या वाहनांच्या चाकांच्या घर्षणामुळे स्वरांची निर्मिती होते. हे स्वर वाहनातील प्रवाशांना स्पष्टपणे ऐकू येतात. दक्षिण मुंबईकडून उत्तरेकडे जाताना मरीन ड्राइव्हवरील बोगदा संपल्यानंतर या मेलोडी रोडची सुरुवात होते. पहिल्या मार्गिकेत सध्या ५०० मीटरपर्यंतच या विशेष पट्ट्या बसवण्यात आल्या असून, पुढील टप्प्यात विस्ताराचा विचार केला जाण्याची शक्यता आहे.

आंतरराष्ट्रीय दर्जाच्या हंगेरियन तंत्रज्ञानाच्या साहाय्याने तयार करण्यात आलेली ही प्रणाली भारतीय संगीत आणि आधुनिक अभियांत्रिकी यांचा संगम मानली जात आहे. मुंबईतील वातावरण, ऋतूतील बदल किंवा समुद्रावरील वाऱ्याचा वेग यांचा परिणाम न होता जय होची धून ऐकूयेईल, असा दावा संबंधित अधिकाऱ्यांकडून करण्यात आला आहे. वाहतूक सुलभ करण्याबरोबरच प्रवास अधिक आनंददायी करण्याचा हा प्रयत्न असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे कोस्टल रोडवरून प्रवास करण्याची उत्सुकता मुंबईकरांमध्ये वाढली आहे. भारतातील पहिल्याच मेलोडी रोडचा अनुभव घेण्यासाठी नागरिक आतुर असल्याचे चित्र आहे.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची पहिली बैठक संपन्न

**पुणे, ता.१२ :** राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे माजी पालकमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातातील निधनानंतर पुणे जिल्ह्याच्या राजकीय व प्रशासकीय घडामोडींना वेग आला आहे. त्यांच्या पश्चात राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदी शपथ घेतलेल्या सुनेत्रा पवार यांची पुण्याच्या पालकमंत्रीपदी नियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची (डीपीसी) पहिली बैठक आज पार पडली.



पुणे विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित या बैठकीत सुनेत्रा पवार या मुंबईहून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाल्या. अजित पवार यांच्या निधनानंतरची ही पहिलीच डीपीसी बैठक असल्याने राजकीय वर्तुळात तिचे विशेष महत्त्व मानले जात आहे. बैठकीस जिल्ह्यातील सर्व आमदार, खासदार आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत मागील वर्षातील कामकाजाचा आढावा घेण्यात आला. तसेच २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी जिल्ह्याचा विकास आराखडा तयार करून आवश्यक निधीची मागणी करण्याबाबत चर्चा झाली. जिल्ह्यातील पायाभूत सुविधा, ग्रामीण विकास, शिक्षण, आरोग्य आणि जलसंधारण यांसारख्या प्रमुख विषयांवर प्राधान्यक्रम ठरविण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती मिळत आहे. बैठकीला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, चंद्रकांत पाटील, अमोल कोल्हे, सुप्रिया सुळे हे ऑनलाइन सहभागी झाले होते. तसेच नीलम गोऱ्हे, दत्तात्रय भरणे, माधुरी मिसाळ तसेच आमदार सुनील शेळके, राहुल कुल आणि शंकर मांडेकर उपस्थित होते. दरम्यान, आतापर्यंत उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री म्हणून अजित पवार हे स्वतः डीपीसीचा आराखडा मंजूर करत निधी वाटप करत असत. आता अर्थ खाते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे असल्याने आगामी काळात निधी वाटपाच्या धोरणात काय बदल होणार, याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा रंगू लागली आहे. विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेसच्या लोकप्रतिनिधींना पूर्वीप्रमाणेच प्राधान्य मिळेल का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अजित पवार यांच्या अनुपस्थितीत सुनेत्रा पवार यांच्या समोर जिल्ह्याच्या विकासाचा वेग कायम ठेवण्याचे मोठे आव्हान आहे. त्यांच्या नेतृत्वाखालील ही पहिली बैठक भविष्यातील धोरणात्मक दिशादर्शक ठरणार का, याबाबत उत्सुकता आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

# विद्यापीठ चौक उड्डाणपुलाला 'अजित पवार' यांचे नाव द्या

## आमदार सिद्धार्थ शिरोळे यांची मागणी



**पुणे, ता. १२ :** पुणे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत विविध विकासकामांबाबत महत्त्वाच्या मागण्या मांडण्यात आल्या. उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. बैठकीदरम्यान आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकातील प्रस्तावित उड्डाणपुलाला माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांचे नाव देण्याची मागणी केली. तसेच या उड्डाणपुलाचे काम वेगाने पूर्ण करण्यासाठी प्रशासनाला स्पष्ट निर्देश द्यावेत, अशी विनंती त्यांनी केली. विद्यापीठ चौक परिसरात दररोज मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असल्याने हा प्रकल्प लवकर पूर्ण होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी छत्रपती शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघातील इतर प्रश्नांकडेही लक्ष वेधण्यात आले. शहरातील काही भागांमध्ये ओव्हरहेड वीज तारा धोकादायक स्थितीत असल्याचे नमूद करत त्या तारा भूमिगत करण्यासाठी आवश्यक निधी द्यावा, अशी मागणी करण्यात आली. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हे काम प्राधान्याने करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

पुणे आणि खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डांचे पुणे महानगरपालिकेत विलीनीकरण लवकर करावे, असेही बैठकीत सांगण्यात आले. विलीनीकरण झाल्यास प्रशासन एकसमान होईल आणि नागरिकांना सेवा देण्याची प्रक्रिया अधिक सोपी होईल, असे मत मांडण्यात आले.

याशिवाय पुणे जिल्ह्यात बिबट्यांच्या वाढत्या हालचालींबाबत चिंता व्यक्त करण्यात आली. मानव आणि वन्यप्राण्यांमधील संघर्ष टाळण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. बैठकीत मांडलेल्या सर्व विषयांवर संबंधित विभागांकडून पुढील कार्यवाही केली जाणार असल्याची माहिती देण्यात आली.

## पुण्यातील ज्येष्ठ नागरिकाची २२ कोटींची फसवणूक

**पुणे, ता. १२ :** शेअर बाजारामध्ये गुंतवणुकीवर भरघोस परतावा मिळवून देण्याचे स्वप्न दाखवून फसवणूक करणाऱ्या टोळ्यांनी आता पुण्याला लक्ष्य केले आहे. शहरातील एका ८५ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला तब्बल २२ कोटी रुपयांचा गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ही पुण्यातील आतापर्यंतची सर्वात मोठी सायबर फसवणूक मानली जात आहे. तक्रारदार ज्येष्ठ नागरिकाला सोशल मीडियाच्या माध्यमातून शेअर मार्केटमध्ये 'हमखास आणि आकर्षक परतावा' देण्याचे आमिष दाखवण्यात आले होते. सुरुवातीला त्यांचा विश्वास संपादन करण्यासाठी आरोपींनी एका बनावट पद्धारे नफा होत असल्याचे भासवले. नफा पाहून त्यांनी वेळोवेळी तब्बल २२ कोटी रुपये गुंतवले. मात्र, जेव्हा पैसे काढण्याची वेळ आली, तेव्हा आरोपींनी टाळाटाळ सुरू केली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी तात्काळ पुणे सायबर पोलिसांकडे तक्रार नोंदवली.

**प्राईम लाईफ**



## उन्हाळ्यात दही की ताक? आरोग्यासाठी सर्वोत्तम काय? जाणून घ्या अधिक माहिती

उन्हाळ्याचा तडाखा वाढू लागला की, शरीराची लाहीलाही होते. अशा वेळी थंडावा मिळवण्यासाठी आपण अनेकदा दही किंवा ताकाचा आधार घेतो. अनेकजण या दोन्ही पदार्थांना सारखेच मानतात, मात्र उन्हाळ्याच्या दिवसात दह्यापेक्षा ताक पिणे अधिक फायदेशीर असल्याचे आरोग्यतज्ज्ञ आणि आयुर्वेद सांगते.

ताकच का चांगले?

उन्हाळ्यात ताक पिणे हे दह्यापेक्षा अधिक आरोग्यदायी का आहे, याची काही प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत:

१. पचनासाठी हलके: दही हे पचायला जड असते. उन्हाळ्यात आपली पचनसंस्था आधीच मंदावलेली असते, त्यामुळे घट्ट दही खाल्ल्याने अपचन किंवा सुस्ती जाणवू शकते. याउलट, ताक हे दही घुसळून आणि त्यात पाणी मिसळून बनवले जाते, त्यामुळे ते पचायला अत्यंत हलकेअसते.

२. डिहायड्रेशनवर रामबाण उपाय : ताकात पाण्याचे प्रमाण ९०% पेक्षा जास्त असते. उन्हाळ्यात घामावाटे शरीरातील पाणी आणि इलेक्ट्रोलाईट्स बाहेर पडतात. ताक हे एक नैसर्गिक हायड्रेटिंग ड्रिंक म्हणून काम करते आणि शरीरातील पाण्याची पातळी टिकवून ठेवते.

३. नैसर्गिक थंडावा: आयुर्वेदानुसार, दह्याची प्रकृती ही उष्ण मानली जाते, ज्यामुळे काही लोकांमध्ये पित्त वाढू शकते. मात्र, घुसळलेले ताक हे प्रकृतीने शीतल (थंड) असते. ते प्यायल्याने शरीराचे तापमान त्वरित कमी होण्यास मदत होते.

ताक पिण्याची योग्य वेळ आणि पद्धत

वेळ : ताक नेहमी दुपारच्या जेवणानंतर प्यावे. रात्री ताक पिणे टाळावे, कारण यामुळे कफ किंवा घसा दुखण्याची शक्यता असते.

मसाल्यांचा वापर: ताकाची शक्ती वाढवण्यासाठी त्यात भाजलेली जिरे पूड, सैंधव मीठ, आले आणि कोथिंबीर आवर्जून टाकावी. यामुळे गॅस आणि सिडिटीचा त्रास कमी होतो.

# अजित पवारांचा अपघाताच्या आदल्या रात्री पिंकी माळीला नेमकं काय सांगायचे होतं?



**मुंबई, ता. १२ :** राज्याचे लोकप्रिय नेते अजित पवार यांच्या विमान अपघाताला १५ दिवस उलटले असले, तरी या घटनेभोवतीचे गूढ कमी होण्याऐवजी अधिक गडद होत चालले आहे. मंगळवारी रोहित पवार यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांनंतर, आता या अपघातातील पीडित पिंकी माळी यांचे वडील शिवकुमार माळी यांनी थेट घातपाताचा संशय व्यक्त केला आहे. त्या दिवशी विमान आणि पायलट दोन्ही का बदलण्यात आले? या त्यांच्या एका प्रश्नाने तपास यंत्रणांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे केले आहे.

**पिंकी माळींच्या वडिलांचा खळबळजनक दावा**

अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या पिंकी माळी यांचे वडील शिवकुमार माळी यांनी माध्यमांसमोर आपला टाहो फोडला. त्यांच्या मते, अपघाताच्या आदल्या रात्री पिंकी म्हणाली होती की तिला काही महत्त्वाच्या गोष्टी सांगायच्या आहेत. पण दुसऱ्या दिवशी सकाळी ९ वाजताच ही काळजाचा थरकाप उडवणारी घटना घडली. सकाळी ६ वाजता 'ट्रॅफिक जाम'चे कारण पुढे करून विमानाचे वेळापत्रक किंवा मार्ग बदलला जाणे, हे तर्कसंगत वाटत नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.


**राजकीय आरोप-प्रत्यारोपांची राळ**

रोहित पवार यांनी आधीच या प्रकरणाच्या सखोल चौकशीची मागणी केली असताना, आता आमदार अमोल मिटकरी यांनीही यात उडी घेतली आहे. पायलटला काही आमिष दाखवून हा आत्मघाती हल्ला तर घडवून आणला नाही ना? विमानतळाचे सीसीटीव्ही फुटेज समोर का आणले जात नाही? असे गंभीर प्रश्न मिटकरी यांनी उपस्थित केले आहेत.

**प्रत्यक्षदर्शींनी काय पाहिले?**

गोजूबावी गावच्या शिवारातील प्रत्यक्षदर्शींच्या सांगण्यानुसार, अपघात होण्यापूर्वी विमान अत्यंत कमी उंचीवरून उडत होते. विमानातून कोणताही धूर निघत नव्हता, मात्र अचानक ते कोसळले. तांत्रिक बिघाड होता की वैमानिकाने जाणीवपूर्वक असे केले, याचा तपास होण्याची गरज प्रत्यक्षदर्शींनी व्यक्त केली आहे.

## आळंदीतील देहविक्रीचे मोठे रॅकेट उद्ध्वस्त




**पिंपरी-चिंचवड, ता. १२ :** आळंदी-चऱ्होली रस्ता, जो वारकरी आणि भाविकांच्या वर्दळीने गजबजलेला असतो, त्याच परिसरातील एका हॉटेलमध्ये सुरू असलेल्या काळ्या धंद्याचा पिंपरी-चिंचवड पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. 'साई पॅलेस' हॉटेलवर मध्यरात्री २ वाजता टाकलेल्या छाप्यात तब्बल १७ महिलांची देहविक्रीच्या दलदलीतून सुटका करण्यात आली असून ६ मुख्य सूत्रधारांना अटक करण्यात आली आहे.

आळंदीत गेल्या काही काळापासून शहराच्या बाह्य भागात असलेल्या लॉजिंग-बोर्डिंगच्या नावाखाली अनैतिक प्रकार सुरू असल्याच्या तक्रारी येत होत्या. आळंदी-चऱ्होली रस्ता हा पुणे आणि पिंपरी-चिंचवडला जोडणारा महत्त्वाचा मार्ग असल्याने येथे लॉजिस्टिक आणि हॉटेल व्यवसाय मोठ्या प्रमाणात वाढला आहे. याच वर्दळीचा फायदा घेत आरोपींनी 'साई पॅलेस'मध्ये देह विक्रीचा व्यवसाय सुरु केला होता. गुन्हे शाखेला मिळालेल्या ठोस माहितीनुसार, पोलिसांनी अत्यंत गोपनीयतेने मोहीम आखली.

गरिबीचा फायदा घेऊन परराज्यातील महिलांना पुण्यात आणले जात होते. आरोपी कृष्णा पाटील, राज मोहन शेट्टी आणि त्यांच्या साथीदारांनी महिलांना कामाचे आणि चांगल्या पैशांचे आमिष दाखवून या व्यवसायात ढकलले होते. या प्रकरणी 'पिटा' कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून पोलिस अधिक तपास करत आहेत.

## दोरीमुळे दुचाकीस्वार तरुण गंभीर जखमी; ठेकेदाराविरोधात गुन्हा दाखल




**पुणे, ता. १२:** कर्वेनगरपरिसरात बुधवारी दुपारी एक धक्कादायक घटना घडली. दुचाकीवरून मित्रासोबत जात असताना रस्त्यावर आलेल्या दोरीमुळे एका २३ वर्षांच्या तरुणाचा गळा चिरला गेला. रक्तस्राव मोठ्या प्रमाणात झाल्याने त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे. झाडांच्या फांद्या तोडण्याचे काम सुरू असताना योग्य खबरदारी न घेतल्यामुळे ही घटना घडल्याचे समोर आले आहे.

रामेश्वर अवतीकर आणि त्याचा मित्र सुधीर लांडगे हे दोघे दुपारी सुमारे २ वाजण्याच्या सुमारास भुजबळ बंगल्याजवळून दुचाकीवरून जात होते. मेघराज सोसायटीसमोरून जात असताना फांद्या तोडण्यासाठी बांधलेली दोरी अचानक त्यांच्या मार्गात आली. ही दोरी रस्त्यावर खाली आलेली असल्याने ती दुचाकीस्वारांना दिसली नाही. दुचाकी वेगात असल्यामुळे दोरी थेट रामेश्वरच्या गळ्यात अडकली आणि त्याचा गळा खोलवर जखमी झाला. तो रस्त्यावर कोसळला. मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाल्याने परिसरात एकच गोंधळ उडाला.

तपासात असे समोर आले आहे की संबंधित सोसायटीने फांद्या तोडण्याची परवानगी घेतली होती. मात्र काम करताना सुरक्षेचे नियम पाळले गेले नाहीत. रस्ता बंद करण्यात आला नव्हता. वाहनचालकांना इशारा देणारे कोणतेही फलक लावले नव्हते. तसेच अधिकृत देखरेखीशिवाय काम सुरू असल्याची माहिती मिळाली आहे. स्थानिक नागरिकांनी तातडीने जखमींना खासगी रुग्णालयात हलवले. या प्रकरणी सुधीर लांडगे यांनी दिलेल्या तक्रारीवरून अलंकार पोलीस ठाण्यात अज्ञात ठेकेदाराविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त अस्मिता तांबे यांनी रुग्णालयात भेट देऊन घटनेची माहिती घेतली असून जबाबदार व्यक्तींवर कारवाई केली जाईल, असे सांगितले आहे.

## कर्जत–पनवेल मार्गावर एसटी व कारचा अपघात; दोघे जण जखमी



मुंबई, ता. १२: मुंबई जवळील कर्जत परिसरात पनवेलकर्जत मार्गावर झालेल्या भीषण अपघाताने पुन्हा एकदा या रस्त्यावरील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आणला आहे. कर्जत चौक रोडवर संध्याकाळच्या सुमारास मारुती सुझुकी एर्टिगा कार आणि एसटी महामंडळाच्या बसची समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातात कारमधील दोघेजण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रायगड येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

प्राथमिक माहितीनुसार, पनवेलहून कर्जतकडे येणारी एसटी बस आणि कर्जतहून चौकखालापूरकडे जाणारी एर्टिगा कार यांच्यात हा अपघात झाला. धडक इतकी भीषण होती की कारचा पुढील भाग पूर्णपणे चक्काचूर झाला. बसच्या चालकाच्या बाजूलाही मोठे नुकसान झाले आहे. दोन्ही वाहने भरधाव वेगात असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे, मात्र नेमके कारण तपासाअंती स्पष्ट होणार आहे. अपघातानंतर बसमधील प्रवाशांनी तत्काळ मदतकार्य सुरू केले. स्थानिकांनी आणि पोलिसांनी मिळून जखमींना बाहेर काढले. जखमी युवक वांगणी येथील असल्याची माहिती मिळाली असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगितले जाते. कर्जत आणि खालापूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत करण्यासोबतच पंचनामा केला आहे.

पनवेलकर्जत मार्ग हा वळणावळणाचा आणि काही ठिकाणी अरुंद आहे. वाढती वाहतूक, ओव्हरटेकिंगची घाई आणि वेगमर्यादेचे उल्लंघन यामुळे या मार्गावर अपघातांची संख्या वाढत असल्याची तक्रार स्थानिकांकडून वारंवार केली जाते. विशेषतः संध्याकाळच्या वेळेत वाहनांची गर्दी वाढते, ज्यामुळे धोका अधिक वाढतो. या घटनेनंतर स्थानिकांनी रस्त्यावरील वेगनियंत्रण उपाययोजना, चेतावणी फलक आणि नियमित गस्त वाढवण्याची मागणी केली आहे. पोलिसांकडून सीसीटीव्ही फुटेज आणि वाहनांच्या तांत्रिक स्थितीची तपासणी केली जात आहे. अंतिम अहवालानंतरच अपघाताचे नेमके कारण स्पष्ट होईल; मात्र निष्काळजीपणाची किंमत किती महागात पडू शकते, याची ही आणखी एक धक्कादायक आठवण आहे.

## पुणे शहर परिसरातील 'हे' रस्ते १७ फेब्रुवारीपर्यंत पूर्णपणे बंद




**पुणे, ता. १२ :** पुणे शहरात राज्य पोलिस दलाच्या मोठ्या भरती प्रक्रियेला ११ फेब्रुवारीपासून सुरुवात झाली असून यंदा तब्बल १५,३०० पदांसाठी भरती होत आहे. हजारो उमेदवार दररोज शारीरिक चाचणी आणि इतर प्रक्रियांसाठी हजर राहत असल्याने पाषाण परिसरात वाहतुकीवर तात्पुरते निर्बंध लागू करण्यात आले आहेत.

पुणे ग्रामीण पोलीस मुख्यालय, पाषाण येथील अंतर्गत रस्ते १७ फेब्रुवारीपर्यंत दररोज पहाटे ४ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत सर्वसामान्य वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहेत. या काळात मुख्यालय परिसरात उमेदवारांची मोठी गर्दी होत असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आल्याचे वाहतूक शाखेचे उपायुक्त हिमंत जाधव यांनी स्पष्ट केले आहे.

वाहतूक बदलांनुसार, पाषाण रोडवरील पोलीस अधीक्षक कार्यालयापासून पुरंदर हॉल, बाणेर रोडपर्यंतचा मार्ग तसेच पाषाण रोडवरील पेट्रोल पंप ते बाणेर रोडवरील पेट्रोल पंप या दरम्यानची वाहतूक प्रभावित होणार आहे. त्यामुळे या मार्गावरून नियमित प्रवास करणाऱ्या नागरिकांनी पर्यायी मार्गांचा वापर करणे आवश्यक आहे.

प्रशासनाने पुणे विद्यापीठ चौक मार्गे पर्यायी मार्ग स्वीकारण्याचे आवाहन केले आहे. सकाळच्या वेळेत विशेषतः आयटी पार्क, बाणेरपाषाण परिसर आणि विद्यापीठ रस्ता या भागात वाहतुकीची कोंडी होण्याची शक्यता असल्याने प्रवाशांनी अतिरिक्त वेळ गृहित धरून प्रवासाचे नियोजन करावे, असेही सांगण्यात आले आहे.

दरम्यान, पोलिस भरती प्रक्रियेदरम्यान शिस्तबद्ध व्यवस्थापन, वैद्यकीय सुविधा आणि सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. राज्यभरातील उमेदवार पुण्यात येत असल्याने स्थानिक वाहतुकीवर ताण वाढणे अपेक्षित आहे. त्यामुळे नागरिकांनी संयम बाळगून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पोदार इंटरनॅशनल स्कूलचे तिसरे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात




**लोणी काळभोर, ता. १२ :** मांजरी (ता. हवेली) येथील पोदार इंटरनॅशनल स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या विद्यालयाचे तिसरे वार्षिक स्नेहसंमेलन विठ्ठलराव तुपे सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. गणपत मोरे होते. यावेळी पोदार स्कूल मांजरीचे जनरल मॅनेजर मनोज काळे, प्राचार्य मीनल वैद्य तसेच पोदार समूहातील इतर मुख्याध्यापक व मुख्याध्यापिका उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. यानंतर प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेली हनुमानाची शौर्यगाथा आणि माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेली कृष्णकथा या सादरीकरणांनी उपस्थितांची मने जिंकली. नृत्य, नाटिका, समूहगीत, एकांकिका अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांतून विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे प्रभावी दर्शन घडविले.

दरम्यान, विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणारा हा स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम सर्वांसाठीच आनंददायी ठरला. शैक्षणिक, क्रीडा तसेच विविध उपक्रमांत उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांनी सातत्याने परिश्रम करत आत्मविश्वासाने पुढे जावे व जीवनात यश संपादन करावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल प्राचार्यांनी शिक्षकवृंद, विद्यार्थी व पालकांचे आभार मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

# भाजपचे माजी आमदार राम सातपुते यांच्या हत्येचा कट; जयकुमार गोरे यांचा दावा



**सोलापूर, ता. १२ :** जिल्हा परिषद निवडणुकीचा निकाल लागताच सोलापूरच्या राजकीय आखाड्यात आरोप-प्रत्यारोपांच्या धुराळा उडाला आहे. भाजपचे माजी आमदार राम सातपुते यांच्या हत्येचा कट रचण्यात आल्याचा खळबळजनक दावा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केला आणि जिल्ह्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली. या प्रकरणावरून आता भाजप आणि मोहिते-पाटील समर्थक समोरासमोर आले असून, 'मुर्दाडाला कोण मारणार?' या उत्तम जानकरांच्या विधानाने या वादात तेल ओतले आहे.

**नेमका आरोप काय?**

राम सातपुते यांनी थेट खासदार धैर्यशील मोहिते पाटील आणि अर्जुनसिंह मोहिते पाटील यांच्यावर या कटाचे 'मास्टरमाईंड' असल्याचा आरोप केला आहे. सातपुते यांच्या दाव्यानुसार, ही एक 'कॉन्ट्रॅक्ट किलिंग'ची योजना होती. पोलिसांना या कटाची कुणकुण आधीच लागली होती, म्हणूनच गेल्या तीन दिवसांपासून पोलीस माळशिरसमध्ये तळ ठोकून आहेत. मी या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्र्यांना एक पत्र दिले आहे, असे सातपुते यांनी स्पष्ट केले.

**'मुर्दाड माणसाला कोण मारणार?' जानकरांचा टोला**

भाजपच्या या आरोपावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार उत्तम जानकर यांनी अत्यंत तिखट भाषेत समाचार घेतला. सोलापुरात माध्यमांशी बोलताना ते म्हणाले, निवडणुकीत कार्यकर्त्यांमध्ये किरकोळ धराधरी होते, त्याला हत्येचा कट म्हणणे चुकीचे आहे. सातपुते यांनीच बाबा माने यांच्या तोंडावर गुलाल उडवून आगावपणा केला, त्यातून वादावादी झाली. मुळात, अशा मुर्दाड माणसाला मारायला कोण कशाला येईल? जानकरांच्या या उपरोधिक टीकेमुळे भाजपची कोंडी झाली आहे.

**मोहिते-पाटील गटाचे 'वैफल्यग्रस्त' लेबल**

खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. माढा मतदारसंघात सपाटून पराभव झाल्यामुळे राम सातपुते आणि जयकुमार गोरे वैफल्यग्रस्त झाले आहेत. प्रसिद्धीच्या झोतात राहण्यासाठीच ते मोहिते-पाटील घराण्यावर असे बिनबुडाचे आरोप करत आहेत. सातपुते यांच्या बुद्धीवर निवडणुकीच्या निकालाचा परिणाम झाला आहे, असे चोख प्रत्युत्तर त्यांनी दिले.

१. जिल्ह्याचे वर्चस्व : जिल्हा परिषद निकालानंतर सोलापूरच्या ग्रामीण भागावर कोणाचे वर्चस्व राहणार, यावरून ही लढाई सुरू आहे.

२. सुरक्षेचा प्रश्न : जर खरोखरच लोकप्रतिनिधीच्या हत्येचा कट असेल, तर ती कायदा-सुव्यवस्थेची गंभीर स्थिती आहे.

३. मोहिते-पाटील विरुद्ध भाजप: आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोहिते-पाटील आणि भाजपमधील संघर्ष अधिक तीव्र होताना दिसत आहे.